# राशिभविष्य - नोव्हेंबर, २०२२.

दादा दामले (dadadamle@gmail.com)

==========================================================

**सूचना - प्रत्येक राशिभविष्याच्या अखेरीस त्या त्या राशीच्या जन्मनक्षत्रांसाठी असलेला तारक मंत्र दिला आहे.आपल्या जन्मनक्षत्राच्या तारक मंत्राचा उपाय म्हणून मनापासून श्रद्धेने उपयोग केल्यास जीवनात येणाऱ्या अडचणी, अडथळे, व्याधी, पीडा, आजार, व अन्य समस्या यांचे निवारण होते, असा अनेकांचा अनुभव आहे. आपणही तसा प्रयत्न करून पाहावा व आपणांसही तसा अनुभव आल्यास कृपया आम्हांस कळवावे.**

==========================================================

**(१) मेष -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत राहू व वक्री हर्षल असून येथील हर्षलमुळे स्वभाव अस्थिर, चंचल, लहरी असा घडणे संभवते. कोणाचाही धाक, दडपण सहन होणार नाही. पण हा हर्षल काही प्रमाणात शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. येथील राहू मात्र प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे सतत अपमान होणे संभवते. तसे घडल्यास मनात सूडभावना निर्माण होईल. त्याशिवाय या राशीच्या काही मंडळींना वातविकाराचा आजार त्रस्त करीतसे दिसते. या राशीच्या तृतीय स्थानी मिथुन राशीत वक्री मंगळ असून तो दिनांक १३ पासून वक्र गतीने या राशीच्या धनस्थानी वृषभ राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात तो काही प्रमाणात अनुकुल होईल; पण त्याच्यामुळे इजा, दुखापत होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या धनस्थानी गेल्यावर आर्थिक समस्या त्रस्त करतील. तसेच तो अनारोग्यकारक होणेही संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी तुळा राशीत रवि , अस्तंगत बुध, अस्तंगत शुक्र व केतू असे चार ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात येथील रवि - बुध -शुक्र या राशीच्या अष्टम स्थानी वृश्चिक राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत महिन्याच्या पूर्वार्धात रवि केंद्रस्थानी असल्याने अनुकुल होण्याची शक्यता आहे. पण संपूर्ण महिन्याच्या काळात तो अनारोग्यकारक, दुःख दायक, निराशाजनक होण्याचीच शक्यता दिसते. बुध महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल व उत्तरार्धात अनुकुल असला तरी तो अस्तंगत असल्याने किती प्रमाणात अनुकुल/प्रतिकुल होईल ते सांगणे कठीण आहे. शुक्र महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल होणार असला तरी तो अस्तंगत असल्याने किती लाभदायक होईल ते सांगता येत नाही. पण या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या केतूमुळे पूर्वार्धात शुभ संबंधित असल्याने तो

अनुकुल होईल; पण त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होणे संभवते. या राशीच्या दशम स्थानी मकर राशीत शनि असून तो चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. तसेच कोळसा, लोखंड,पोलाद यांचा व्यापार असणाराना लाभदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी कुंभ राशीत वक्री नेपच्यून असून त्याच्यामुळे आर्थिक नुकसान होणे संभवते. तसेच कुमार्गी मित्रांपासून त्रास होणे संभवते व त्यामुळे नैराश्य येणेही शक्य दिसते. या राशीच्या व्यय स्थानी मीन राशीत वक्री गुरु असून त्याच्यामुळे कौटुंबिक त्रास, प्रवासात त्रास होणे संभवते. तसेच तो अध्यात्म व सामाजिक कार्य यांस अनुकुल असला तरी तो वक्री असल्याने किती प्रमाणात अनुकूल होईल ते सांगणे कठीण दिसते. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मा:शक्ती आणि मन:शांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र अश्विनी आहे त्यांनी "ओम अश्विनीकुमाराभ्यां नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र भरणी आहे त्यांनी "ओम यमाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी " ओम अग्नये नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(२) वृषभ -** या राशीच्या धनस्थानी मिथुन राशीत वक्री मंगळ असून तो महिन्याच्या उत्तरार्धात वक्र गतीने या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत येत आहे. अशा परिस्थितीत तो संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे आर्थिक समस्या त्रस्त करतील, उष्णताविकार बळावतील, स्वभाव हट्टी होईल, व त्यातून अकारण श्रम दगदग कराल. नोकरदार मंडळींना नोकरीत प्रतिकुल परिस्थितीला सामोरे जावे लागेल. या राशीच्या षष्ठ स्थानी तुळा राशीत केतू -रवि व अस्तंगत बुध -शुक्र असे चार ग्रह असून येथील रवि -बुध -शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी वृश्चिक राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला केतू अनुकुल होईल व त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील. आचारविचार उच्च होतील, मनस्थिती उदार होईल, व्यवसायात अपेक्षित सहकार्य लाभेल, क्वचित कोणास प्रसिद्धी मिळणेही संभवते. रवि ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल पण तो अनारोग्यकारक होणेही संभवते. महिन्याच्या उत्तारार्धात तो या राशीच्या सप्तम स्थानी वृश्चिक राशीत गेल्यावर केंद्रस्थानी असल्यामुळे भाग्योदयकारक होईल. येथील बुध -शुक्र अस्तंगत असल्याने त्यांचा फारसा प्रभाव दिसून येणार नाही. या राशीच्या भाग्यस्थानी मकर राशीत शनि असून तो चिकित्सक बौद्धिक

कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येतील. या राशीच्या दशम स्थानी कुंभ राशीत वक्री नेपच्यून असून तो काही प्रमाणात मनोवैज्ञानिक व द्रव पदार्थ व्यापार-व्यवसाय असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी मीन राशीत वक्री गुरु असून तो काही प्रमाणात अनुकुल होईल व त्याच्यामुळे इच्छा आकांक्षा पूर्ण होतील, अर्थलाभ होणेही संभवते, विवाहेच्छूना विवाहयोग संभवतो. मित्रलाभ होईल. या राशीच्या व्यय स्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असून राहूमुळे दिखाऊ आचरण होईल. पण अर्थलाभ होणेही संभवते. पण वक्री हर्षलमुळे काही मंडळींना वाईट प्रसंगाला तोंड द्यावे लागण्याची शक्यता दिसते. सांपत्तिक अडचणी त्रस्त करतील, शत्रुत्व निर्माण करील व अपघातभयही संभवते. जपा. श्रद्धा असेल तर “श्रीशिवशंकरा”ची व “श्रीहनुमाना”ची उपासना अनुकुल होईल व मनःशक्ती आणि मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी “ओम अग्नये नमः” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र रोहिणी आहे त्यांनी “ओम ब्रह्माय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी “ओम सोमसोमाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(३) मिथुन -** या राशीच्या प्रथम(लग्न) स्थानी याच राशीत वक्री मंगळ असून तो दिनांक १३ पासून वक्र गतीने या राशीच्या व्ययस्थानी वृषभ राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होणार असून त्याच्यामुळे स्वभाव हट्टी बनेल, अकारण श्रम, दगदग कराल, अहंकार बळावेल, नोकरीत प्रतिकुल परिस्थिती निर्माण होईल, अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेल, वाद, भांडणे होतीलआणि आर्थिक चिंता अस्वस्थ करतील. जपा. या राशीच्या पंचम स्थानी तुळा राशीत रवि, केतू, अस्तंगत बुध व अस्तंगत शुक्र असे चार ग्रह असून येथील रवि आणि अस्तंगत बुध -शुक्र हे तीन ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी वृश्चिक राशीत जात आहेत. त्यामुळे रवि महिन्याच्या पूर्वार्धात अनारोग्यकारक होणे संभवते. तसेच त्याच्यामुळे मनस्थिती अस्थिर, चंचल राहील, नोकरीत वरिष्ठांचा जाच सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. तसेच तो अपघातकारक असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करणे आवश्यक होईल. संततीपैकी कोणाच्या अनारोग्याची चिंता त्रस्त करील. त्याशिवाय घरातील प्रिय जनांपैकी कोणाचे दूरत्व निर्माण झाल्यास मन अस्वस्थ होईल. महिन्याच्या

उत्तरार्धात हा रवि या राशीच्या षष्ठ स्थानी वृश्चिक राशीत गेल्यावर दशम या व्यवसायस्थानास पूरक होईल, हितशत्रू पराभूत होतील, पण तो अनारोग्यकारक होण्याची शक्यता दिसते. या राशीच्या पंचम स्थानी असलेला केतू अनुकुल व शुभकारक होईल; पण त्याच्यामुळे या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडचणी, अडथळे निर्माण होणे संभवते. येथील बुध -शुक्र अस्तंगत असल्यामुळे महिन्याच्या संपूर्ण काळात त्यांच्याविषयी काही अंदाज वर्तविणे अशक्य होत आहे. या राशीच्या अष्टम स्थानी मकर राशीत शनि असून तो मनस्तापदायक व दु:खदायकच होईल. त्याच्यामुळे अनारोग्य होणे व अपघातभय असणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी कुंभ राशीत वक्री नेपच्यून असून त्याच्यामुळे सूचक स्वप्ने पडतील, काही मंडळींना परदेशवारीची संधी मिळेल, अध्यात्मात रुचि असणारांना उपासनेद्वारा काही प्रमाणात आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. या राशीच्या दशम स्थानी मीन राशीत वक्री गुरु असून तो बौद्धिक व संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होणार असला तरी तो वक्री असल्यामुळे सहजासहजी अनुकुल व यशदायक होणे संभवते नाही. या राशीच्या लाभस्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असे दोन ग्रह असून या लाभस्थानी असलेल्या राहूमुळे नोकरीत ज्यांच्या हाती अधिकार पद आहे अशापैकी काहींना वाम मार्ग धन मिळविण्याची तीव्र इच्छा अस्वस्थ करील. पण त्यांनी तो मोह टाळावाच. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. तसेच जुगाराचा नाद असलेल्यानीही तो नाद सोडावाच असे सांगावेसे वाटते. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या वक्री हर्षलमुळें तो यशदायक व लाभदायक असला तरी त्याच्यामुळे काय घडू शकेल ते निश्चितपणे सांगता येणार नाही. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व दुर्गादेवीची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे व “दुर्गास्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी “ ओम सोमसोमाय नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र आर्द्रा आहे त्यांनी “ओम नमः:शंकराय “ तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी “ओम अदितीये नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(४) कर्क -** या राशीच्या चतुर्थ स्थानी तुळा राशीत रवि, केतु आणि अस्तंगत बुध -शुक्र असे चार ग्रह असून येथील रवि -बुध -शुक्र हे तीन ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी वृश्चिक राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत रवि महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल होणार असून त्याच्यामुळे अनारोग्य, अपघात, कार्य दिरंगाई, कौटुंबिक त्रास, आर्थिक चिंता, नोकरीत वरिष्ठांचा जाच, कुटुंबातील प्रिय

जनांपैकी कोणाचे दूरत्व निर्माण झाल्यास येणारी अस्वस्थता अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. येथील केतूही प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे घरीदारी कोणाशी पटणार नाही, शिवाय त्याच्यामुळे कसली तरी चिंता मनस्थिती अस्वस्थ ठेवील. अस्तंगत बुध -शुक्रामुळे काय काय अनुकुल घडेल ते सांगता येत नाही. या राशीच्या सप्तम स्थानी मकर राशीत शनि असून त्याच्यामुळे चित्तवृत्ती शांत राहील. पण विवाहेच्छूना विवाहयोग संभवत नाही. या राशीच्या अष्टम स्थानी कुंभ राशीत वक्री नेपच्यून असून तो जलभयकारक व विषभयकारक असल्यामुळे खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. तसेच बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या भाग्यस्थानी कुंभ राशीत वक्री गुरु असून तो आध्यात्मिक उपासनेत अडथळे निर्माण करण्याची शक्यता दिसते. प्रवासयोग येईल;पण तो किती सुखकारक होईल ते सांगता येत नाही. या राशीच्या दशम स्थानी मेष राशीत वक्री हर्षल व राहू असे दोन ग्रह असून येथील राहू नोकरी-व्यवसायास अनुकुल होईल व या राशीच्या काही मंडळींना नोकरीत बढती, अधिकारपद मिळू शकेल. क्वचित कोणाचा सन्मान होणेही संभवते. पण येथील वक्री हर्षल बौद्धिक व संशोधनात्मक व्यवसायास अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक असला तरी तो वक्री असल्यामुळे सुखासुखी अपेक्षापूर्ती होणे संभवते नाही. या राशीच्या व्ययस्थानी मिथुन राशीत वक्री मंगळ असून तो महिन्याच्या उत्तरार्धात वक्र गतीने या राशीच्या लाभस्थानी वृषभ राशीत जात आहे. त्यामुळे संपूर्ण महिन्याच्या काळात तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे भांडणे होऊन मनस्थिती अस्वस्थ होणे संभवते. इच्छाअपेक्षा अपूर्ण राहतील. मित्रांशी वितुष्ट येणे संभवते. कष्ट-परिश्रम होऊनच अर्थप्राप्ती होईल. अनारोग्य होणेही संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी "ओम अदितीये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पुष्य आहे त्यांनी "ओम बृहस्पतये नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र आश्लेषा आहे त्यांनी "ओम सर्पाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(५) सिंह -** या राशीच्या तृतीय स्थानी तुळा राशीत रवि, केतु, अस्तंगत बुध -शुक्र असे चार ग्रह असून येथील रवि व अस्तंगत बुध -शुक्र हे तीन ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी वृश्चिक राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत रवि महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होईल, व त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील व नोकरीत वरिष्ठ तुमच्या कामावर प्रसन्न होतील व त्यामुळे सुख, धनलाभ व बढती मिळणे

संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, कार्यदिरंगाई, कौटुंबिक त्रास, असमाधानकारक घटना अशापैकी कारणांनी त्रस्त होणे संभवते. बुधामुळे महिन्याचा पूर्वार्ध प्रतिकुल व उत्तरार्ध अनुकुल होईल. शुक्रामुळे संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, सुखकारक, लाभदायक होणार असला तरी बुध -शुक्र अस्तंगत असल्यामुळे नक्की किती सुखकारक होतील ते सांगता येणे कठीण दिसते. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या केतुमुळे मनस्ताप होणेच संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी मकर राशीत शनि असून त्याच्यामुळे अनारोग्य होणे, शत्रुत्व निर्माण होणे संभवते. गैरसमजुतीने भांडणे होणेही शक्य दिसते. पण तो दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल. या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ राशीत वक्री नेपच्यून असून त्याच्यामुळे विवाहितांच्या वैवाहिक सुखात विविध कारणांनी बाधा येणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी मीन राशीत वक्री गुरु असून तो लाभदायक असला तरी तो वक्री असल्यामुळे सहजासहजी असा अचानक अर्थलाभ होणे संभवत नाही. या राशीच्या भाग्यस्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असे दोन ग्रह असून येथील राहू फिरतीची नोकरी असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. तसेच येथील हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यास अनुकुल असला तरी तो वक्री असल्यामुळे सहजासहजी प्रगतिकारक होणे संभवत नाही. तसेच त्याच्यामुळे काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे तर काहींना परदेशवारीचे योग येणे संभवते. या राशीच्या लाभस्थानी मिथुन राशीत वक्री मंगळ असून तो वक्र गतीने महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या दशम स्थानी वृषभ राशीत जात आहे. त्यामुळे संपूर्ण महिन्याच्या काळात तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे मित्रांशी वितुष्ट येणे संभवते. सुखासुखी अर्थलाभ होणार नाही. स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडतील. प्रवासात मनस्ताप सहन करावा लागेल. जपा. श्रद्धा असेल तर भगवान श्रीविष्णूची उपासना अनुकुल होईल व मनःशक्ती आणि मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “विष्णुसहसरनाम स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मघा आहे त्यांनी “ओंम पितराय नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वा आहे त्यांनी “ओम भगाय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी “ओम आर्यमे नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(६) कन्या -** या राशीच्या धनस्थानी तुळा राशीत रवि, केतु आणि अस्तंगत बुध -शुक्र असे चार ग्रह आहेत. त्यापैकी रवि आणि अस्तंगत बुध -शुक्र हे तीन ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या तृतीय स्थानी वृश्चिक राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत रवि महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे वाद,

भांडणे होणे संभावते. त्याशिवाय वित्तहानी होणे, आर्थिक चिंता त्रस्त करणे, डोळ्याचे अनारोग्य होणे संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो अनुकुल होईल व सर्व सुख,आरोग्य लाभेल. नोकरीत वरिष्ठ तुमच्या कामावर खूष होतील. त्यामुळे काही मंडळींना बढती, तर काही मंडळींचा सन्मान होणे संभवते. क्वचित कोणास एखादे उच्च पद मिळणेही शक्य आहे. पण केतू उपासनेद्वारे आध्यात्मिक उन्नतीस अनुकुल होईल. व मन:शांती लाभेल. पण बुध अस्तंगत असला तरी संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होईल. व त्याच्यामुळे शत्रुत्व निर्माण होणे संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या चतुर्थ स्थानी गेल्यावर काही प्रमाणात मित्रसुख व गृहसौख्य लाभेल. पण धननाश होणे संभवते. शुक्र संपूर्ण महिन्याच्या काळात अनुकुल असला तरी तो अस्तंगत असल्यामुळे त्याच्यासंबंधी निश्चित असे काही सांगणे अशक्य आहे,. या राशीच्या पंचम स्थानी मकर राशीत शनि असून त्याच्यामुळे वृत्ती स्वार्थी, संशयित होईल; पण चिकाटीने प्रयत्न करून बौद्धिक कार्यात प्रगती करणे व यश मिळविणे शक्य होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ राशीत वक्री नेपच्यून असून त्याच्यामुळे उगीचच एखादी आजारभावना किंवा एखादी काल्पनिक चिंता अस्वस्थ करील. त्यातून फसवणूक होणे संभवते. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी मीन राशीत वक्री गुरु असून तो स्वराशीत व अनुकुल असला तरी तो वक्री असल्यामुळे मिळणाऱ्या सुखात व लाभात अडचणी, अडथळे निर्माण होण्याची शक्यता दिसते. या राशीच्या अष्टम स्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असे दोन ग्रह असून येथील राहू अनारोग्यकारक होईल वक्री हर्षल अपघातकारक असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करावे लागेल. या राशीच्या दशम स्थानी मिथुन राशीत वक्री मंगळ असून तो महिन्याच्या उत्तरार्धात वक्र गतीने या राशीच्या भाग्यस्थानी वृषभ राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात त्याच्यामुळे स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडणे संभवते. नोकरीत कामाचा ताण व वरिष्ठांचा जाच सहन करावा लागेल. महिन्याच्या उत्तरार्धात शक्यतो प्रवास करू नका. कारण प्रवासात त्रास, मानहानी होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची आणि श्रीदुर्गादेवीची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे व “दुर्गादेवी स्तोत्रा”चे पठण करा. तसेच दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी “ओम आर्यमे नमः:” तारक मंत्राचा, ज्याचे जन्मनक्षत्र हस्त आहे त्यांनी “ओम सूर्याय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी “ओम त्वष्टे नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(७) तुळा -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत रवि, केतू व अस्तंगत बुध -शुक्र असे चार ग्रह असून त्यापैकी रवि आणि अस्तंगत बुध -शुक्र हे तीन ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी वृश्चिक राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत रवि -बुध हे संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होतील व त्यांच्यामुळे अनारोग्य, मनस्ताप, आर्थिक चिंता, वित्तहानी, मित्रद्रोह, कुसंगतीची बाधा, दुःखद प्रसंग अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. शुक्र महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल होईल व त्याच्यामुळे कौटुंबिक व वैवाहिक जीवनातील सुख लाभेल. या राशीच्या प्रथम स्थानी असलेल्या केतूमुळेही सुखसमाधान लाभेल या राशीच्या चतुर्थ स्थानी मकर राशीत असलेल्या शनीमुळे दुःख व गृहसौख्य हानी होणे संभवते. जपा. या राशीच्या पंचम स्थानी कुंभ राशीत वक्री नेपच्यून असून त्याच्यामुळे मनस्थिती अति भावनाशील होईल. शिवाय तो अध्यात्म व गूढ संशोधन यांस अनुकुल असला तरी वक्री असल्यामुळे सहजासहजी प्रगती होणे व यश मिळणे संभवत नाही. या राशीच्या षष्ठ स्थानी मीन राशीत वक्री गुरु असून त्याच्यामुळे फारसे बिघडणार नाही. चांगले राहील. या राशीच्या सप्तम स्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करण्याचीच शक्यता अधिक दिसते. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे त्यांनी संशय, गैरसमज, वाद अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. या राशीच्या भाग्यस्थानी मिथुन राशीत वक्री मंगळ असून तो महिन्याच्या उत्तरार्धात वक्र गतीने या राशीच्या अष्टम स्थानी वृषभ राशीत जात आहे. त्यामुळे तो संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे मानहानी होणे, प्रवासात मनस्ताप सहन करावा लागणे, अनारोग्य होणे, हाडमोड होणे, वीज, पाणी यांपासून धोका असणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. तसे घडल्यास नैराश्य येईल. श्रद्धा असेल तर शिवशंकराची उपासना व श्रीहनुमानाची उपासना मन:शक्ती व मन:शांती देईल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीशिवलीलामृत स्तोत्रा"चे व पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी "ओम त्वष्टे नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र स्वाती आहे त्यांनी "ओम वायवे नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी "ओम इंद्राग्नये नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या व्ययस्थानी तुळा राशीत केतू, रवि आणि अस्तंगत बुध -शुक्र असे चार ग्रह असून त्यापैकी रवि आणि अस्तंगत बुध -शुक्र हे तीन ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या प्रथम (लग्न)

स्थानी याच राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत केतूमुळे स्वभाव हट्टी, लहरी असा होईल. शुक्र संपूर्ण महिन्याच्या काळात सुखकारक होईल पण रवि -बुध संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होतील व त्यांच्यामुळे अनारोग्य, कार्य अपयश, मनस्ताप, मानहानी होणे, धननाश, कुसंगतीची बाधा, मित्रद्रोह होणे, शरीरपीडा होणे, प्रतिकुल परिस्थिती निर्माण होणे संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी मकर राशीत शनि असून त्याच्यामुळे काही मंडळींना अपेक्षित अशी नवी नोकरी किंवा आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल. पण त्याच्यामुळे भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत वक्री नेपच्यून असून त्याच्यामुळे घरगुती परिस्थितीत गैरसमज, घोटाळे अशापैकी कारणांनी कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येण्याची शक्यता दिसते. या राशीच्या पंचम स्थानी मीन राशीत वक्री गुरु असून तो प्रेमसंबंध, अर्थलाभ, शैक्षणिक प्रगती अशा सर्व बाबतीत सुखदायक असला तरी तो वक्री असल्यामुळे अपेक्षित असे सर्व काही घडेलच याची खात्री देता येत नाही. या राशीच्या षष्ठ स्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असे दोन ग्रह असून येथील राहू अनारोग्यकारकच होईल. पण ज्यांचा परधर्मियांशी व्यावसायिक संबंध आहे अशा मंडळींना अशा संबंधामुळे अर्थलाभ होणे संभवते. वक्री हर्षलमुळे मनस्थिती चंचल, लहरी अशी होईल. त्याशिवाय काही मंडळींना डोकेदुखीचा आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. चिकित्सक बौद्धिक व्यवसाय असणारांनी सतत खोल विचार करू नये. मेंदूला आवश्यक तेवढी विश्रांती द्यावी. नपेक्षा मेंदूविकाराचा आजार होणे संभवते. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी मिथुन राशीत वक्री मंगळ असून तो महिन्याच्या उत्तरार्धात वक्र गतीने या राशीच्या सप्तम स्थानी वृषभ राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो संपूर्ण महिनाच्या काळात प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल व त्याच्यामुळे अनारोग्य, होणे, हाडमोड होणे, वीज-पाणी यांपासून धोका असणे, वैवाहिक जीवनात दोघापैकी कोणाच्या अनारोग्यामुळे, दोघांतील गैरसमज, वाद, भांडणे अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. तसेच ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे त्यांनी संशय, गैरसमज, वाद, मतभेद अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान यांची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालीसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी “ओम इंद्राग्नये नम::” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र अनुराधा

आहे त्यांनी "ओम मित्राय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र ज्येष्ठा आहे त्यांनी "ओम इंद्राय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(९) धनु -** या राशीच्या धनस्थानी मकर राशीत शनि असून त्याच्यामुळे कौटुंबिक जीवनात अनिष्ट घटना घडण्याची शक्यता दिसते. त्याशिवाय आर्थिक समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत वक्री नेपच्यून असून त्याच्यामुळे मनस्थिती अत्यंत भावनाशील होईल, काही मंडळींना जलप्रवासाचे योग येतील तर तर काही मंडळींना परदेशगनाची संधी मिळेल. अध्यात्म व गूढ संशोधन यांची मनापासून ओढ असणारांना काही प्रमाणात प्रगती करणे व यश मिळविणे शक्य होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी मीन राशीत वक्री गुरु असून त्याच्यामुळे काही मंडळींचे स्थावर खरेदीविक्रीचे व्यवहार पूर्ण होतील; पण गुरु वक्री असल्यामुळे त्यातून अपेक्षापूर्ती होण्याची शक्यता कमी आहे. या राशीच्या पंचम स्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असे दोन ग्रह असून येथील राहूमुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत बाधा निर्माण होईल. येथील हर्षल कला व शास्त्रीय संशोधन कार्यास अनुकुल असला तरी तो वक्री असल्यामुळे सहजासहजी प्रगती करणे व यश मिळविणे शक्य होणार नाही. या राशीच्या सप्तम स्थानी मिथुन राशीत वक्री मंगळ असून तो महिन्याच्या उत्तरार्धात वक्र गतीने या राशीच्या षष्ठ स्थानी वृषभ राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात विविध कारणांनी बाधा येणे संभवते. तसेच भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांच्या भागीदारीत संशय, गैरसमज, मतभेद ,वाद अशापैकी कारणांनी भागीदारी तुटण्याची शक्यता दिसते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात हा वक्री मंगळ वक्र गतीने या राशीच्या षष्ठ स्थानी वृषभ राशीत गेल्यावर अनारोग्यकारक होईल. त्याशिवाय त्याच्यामुळे आर्थिक नुकसान होणे, अपप्रचाराचा त्रास होणे संभवते. या राशीच्या लाभस्थानी तुळा राशीत केतू, रवि आणि अस्तंगत बुध -शुक्र असे चार ग्रह असून त्यापैकी रवि आणि अस्तंगत बुध -शुक्र हे तीन ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्ययस्थानी वृश्चिक राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत हे चारही ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल, सुखकारक व लाभदायक होतील. पण महिन्याच्या उत्तरार्धात येथील रवि व अस्तंगत बुध प्रतिकुल होतील व त्यांच्यामुळे शरीरपीडा, मानहानी होणे, नियोजित कामात अपयश येणे, अनारोग्य होणे व आर्थिक चिंता त्रस्त करणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. पण अस्तंगत शुक्र महिन्याच्या संपूर्ण महिन्याच्या काळात अनुकुल होईल व काही प्रमाणात सुखदायक होईल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल

व मन:शक्ती व मन:शांती प्राप्त होईल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्‌धेने "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्‌धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मूळ आहे त्यांनी "ओम निॠतये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाषाढा आहे त्यांनी "ओम उदकाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी "ओम विश्वेदेवाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१०) मकर -** या राशीच्या प्रथम (लग्न)स्थानी याच राशीत शनि असून तो अनारोग्यकारक होणे संभवते. शिवाय त्याच्यामुळे नियोजित कार्यात अडचणी, ,अडथळे निर्माण होणे संभवते. त्याचप्रमाणे कुटुंबातील प्रिय व्यक्तींपैकी कोणाशी दूरत्व निर्माण होण्याची शक्यताही दिसते. या राशीच्या धनस्थानी कुंभ राशीत वक्री नेपच्यून असून त्याच्यामुळे आर्थिक समस्या त्रस्त करतील. या राशीच्या तृतीय स्थानी मीन राशीत वक्री गुरु असून तो या राशीच्या लेखकवर्गाला बऱ्याच प्रमाणात अनुकुल होईल. प्रवासाचे योग येतील. पण एखाद्‌या भावंडाकडून मनस्ताप दिला जाणे संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असून येथील राहू कौटुंबिक सुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता दिसते. येथील वक्री हर्षलमुळे कोणाशी पटणार नाही, आहे त्या परिस्थितीत सुखसमाधान लाभणार नाही, सतत तक्रारी करत राहाल, या राशीच्या षष्ठ स्थानी मिथुन राशीत वक्री मंगळ असून तो महिन्याच्या उत्तरार्धात वक्र गतीने या राशीच्या पंचम स्थानी वृषभ राशीत जात आहे. त्याच्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात अनारोग्य होणे, हाडमोड होणे, चोरी होणे, अपप्रचाराचा त्रास होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे संततीविषयक आणि स्थावरसंबंधी समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या दशम स्थानी तुळा राशीत केतू , रवि आणि अस्तंगत बुध -शुक्र असे चार ग्रह असून येथील केतू या राशीच्या नोकरदार मंडळींपैकी काही मंडळींच्या मनात हाती असलेली नोकरी सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि निर्माण करील. पण त्यांनी मनावर संयम ठेवून आहे ती नोकरीच मनापासून करावी. पण येथील रवि आणि अस्तंगत बुध महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होतील. पण अस्तंगत शुक्र महिन्याच्या पूर्वार्धात कलात्मक नोकरी-व्यवसाय असणारांना प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे नोकरी-व्यवसायात अडचणी, अडथळे निर्माण होतील. शिवाय दु:खदायक घटना घडण्याची शक्यताही दिसते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो रवि -बुधासह या राशीच्या लाभस्थानी वृश्चिक राशीत गेल्यावर अनुकुल व सुखदायक होईल. श्रद्‌धा असेल तर शिवशंकराची व श्री हनुमानाची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती प्राप्त होईल.

त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. .रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी "ओम विश्वेदेवाय नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र श्रवण आहे त्यांनी "ओम विष्णवे नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी "ओम वसवे नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(११) कुंभ -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत वक्री नेपच्यून असून त्याच्यामुळे मनस्थिती अति कोमल होणे संभवते. शिवाय मानसिक संवेदनाही अति जलद होत जातील. त्याचा परिणाम म्हणून गहिरे नैराश्य येईल. या राशीच्या धनस्थानी मीन राशीत वक्री गुरु असून त्याच्यामुळे कुटुंबात शुभ घटना घडतील, व्यवसायात वाढ होईल. आर्थिक प्रगती होईल. या राशीच्या तृतीय स्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असे दोन ग्रह असून येथील राहू अनुकुल असला तरी त्याच्यामुळे बंधुसुखात बाधा येणे संभवते. तसेच येथील वक्री हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यास अनुकुल असला तरी तो वक्री असल्यामुळे अडचणी, अडथळे सहन करूनच अपेक्षित प्रगती साधणे व यश मिळविणे शक्य होईल. या राशीच्या पंचम स्थानी मिथुन राशीत वक्री मंगळ असून तो महिन्याच्या उत्तरार्धात वक्र गतीने या राशीच्या चतुर्थ स्थानी वृषभ राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात त्याच्यामुळे मुलांपैकी कोणाची आचरणविषयक समस्या मनस्तापदायक होण्याची शक्यता दिसते. त्याशिवाय स्वतः:चे अनारोग्य, स्थावरसंबंधी समस्या मन अस्वस्थ करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या भाग्यस्थानी तुळा राशीत केतू, रवि आणि अस्तंगत बुध -शुक्र असे चार ग्रह असून येथील केतूमुळे हातून दिखाऊ, ढोंगी आचारण होणे संभवते. त्याशिवाय तो संततिसुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता दिसते. येथील रवि आणि अस्तंगत बुध महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होतील व त्यांच्यामुळे भय ,निराशा, मानसिक ताण, वडील मंडळींचा विरोध सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. बुधामुळे नियोजित कार्यात अडचणी, अडथळे निर्माण होतील. तसेच वाद, भांडणे होणेही संभवते. पण येथील अस्तंगत शुक्रामुळे गुरुकृपा, सुसंगती, सुखसमाधान, ऐषाराम लाभेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात रवि आणि अस्तंगत बुध -शुक्र या राशीच्या दशम स्थानी गेल्यावर रवि -बुध अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होतील व कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. पण अस्तंगत शुक्रामुळे कलात्मक नोकरी-व्यवसाय असणारांच्या मार्गात अडचणी, अडथळे निर्माण होतील व दु:ख वाटेल. या राशीच्या व्यय स्थानी मकर राशीत शनि असून तो संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होईल व

त्याच्यामुळे संकटपरंपराच कोसळण्याची शक्यता दिसते. अशा परिस्थितीत सर्व आर्थिक व्यवहार सावधानतेने व फसवणूक होणार नाही याची खात्री करूनच करावेत. मानहानी होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. जपा. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची आणि श्रीहनुमानाची उपासना मन:शक्ती व मन:शांती देईल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीशिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी "ओम वसवे नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र शततारका आहे त्यांनी "ओम वरुणाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी "ओम अजैकचरणाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१२) मीन -** या राशीच्या प्रथम (लग्न)स्थानी याच राशीत वक्री गुरु असून तो सर्व प्रकारे अनुकुल असला तरी वक्री असल्याने प्राप्त होणाऱ्या सुखासमाधानात थोडी कमतरता येणे संभवते. या राशीच्या धनस्थानी मेष राशीत राहू आणि वक्री हर्षल असे दोन ग्रह असून येथील राहूमुळे कौटुंबिक जीवनात वाद, भांडणे होणे संभवते. त्याशिवाय आर्थिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. तसेच येथील हर्षल मुळातच अति चंचल, अस्थिर स्वभावाचा असून त्यात तो वक्री असल्याने त्याच्या अस्थिरतेत अधिकच भर पडेल व सर्व गोष्टी अविचाराने होतील. तसेच आपल्या अविचारी, फटकळ बोलण्याने समोरच्याचा अपमान होत आहे याचे भानही राहणार नाही. तसेच विक्षिप्तपणाचे आचरण होणे संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी मिथुन राशीत वक्री मंगळ असून तो महिन्याच्या उत्तरार्धात वक्र गतीने या राशीच्या तृतीय स्थानी वृषभ राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात त्याच्यामुळे कौटुंबिक जीवनातील सुखात विविध कारणांनी बाधा येणे संभवते. तसेच असमाधानकारक घटना घडण्याची शक्यताही दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात तो काही गोष्टीना अनुकुल होणार असला, धैर्य, हिंमत, कर्तबगारी वाढणार असली तरी एखादी दुखापत होणेही संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी तुळा राशीत केतू, रवि आणि अस्तंगत बुध -शुक्र असे चार ग्रह असून त्यापैकी रवि आणि अस्तंगत बुध -शुक्र हे तीन ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी वृश्चिक राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत रवि पूर्णपणे प्रतिकुल होणार असून त्याच्यामुळे अनारोग्य होणे, इच्छा अपूर्ण राहणे, हाती घेतलेल्या कार्यात अपयश येणे, संततिसुखात बाधा पडणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. असे घडल्यास मानसिक ताण वाढेल व नैराश्य येईल. बुध महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात प्रतिकुल होईल. शुक्र महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल.

सुखकारक व लाभदायक होईल. पण बुध -शुक्र अस्तंगत असल्याने त्यांच्यामुळे नक्की काय घडेल ते सांगता येणे कठिण आहे. पण या राशीच्या अष्टम स्थानी तुळा राशीत असलेल्या केतुमुळे अनारोग्य, अपघातभय असून कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या लाभस्थानी मकर राशीत शनि असून तो सर्वसाधारणपणे अनुकुल होईल, आर्थिक लाभ होतील; पण संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या व्ययस्थानी कुंभ राशीत वक्री नेपच्यून असून त्याच्यामुळे चिंता, मानसिक व्यग्रता वाढेल व नैराश्य येणे संभवते. श्रद्धा असेल तर "श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती आणि मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. तसेच दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी "ओम अजैकचरणाय नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराभाद्रपदा आहे त्यांनी "ओम अहिर्बुध्न्याय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र रेवती आहे त्यांनी "ओम पूषाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

=====◦◦◦◦◦o◦◦◦◦◦=====